**जगभर**

# श्रीलंकेतील तमिळ : अब यह देस हुआ बेगाना।

## चंद्रशेखर पुरंदरे

इतिहास कोण कसा पाहतो यावर अनेकदा वर्तमान घटनांची दिशा ठरते. श्रीलंकेतील तमिळ प्रश्न हे याचे उदाहरण.

हा प्रश्न वांशिक, धार्मिक व आर्थिक आहे; राष्ट्रवाद आणि जागतिकीकरणाशी निगडित आहे; तो आजच्या लोकशाही राज्यव्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट करतो त्याबरोबरच असा प्रश्न सोडवण्यासाठी सनदशीर आणि हिंसक या दोन्ही मार्गांचा अपुरेपणा दिसून येतो.

वंश, राष्ट्र, धर्म हे अस्मितेचे मुख्य सांस्कृतिक घटक आहेत. या संदर्भात या विषयासाठी एक उद्धरण बोधक वाटते.

सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांचा मुलगा खान अब्दुल वली खान. काही वर्षांपूर्वी त्यांना एका पत्रकाराने विचारले, ''तुम्ही पाकिस्तानी आहात, मुस्लिम आहात का पठाण आहात?'' वली खान म्हणाले, ''मी तीनही आहे.'' पत्रकाराने पुन्हा तोच प्रश्न विचारला, त्यावर वलीखानांचे उत्तर असे, ''मी गेली तीस वर्षे पाकिस्तानी आहे, गेली १४०० वर्षे मुस्लिम आहे आणि गेली ५००० वर्षे पठाण आहे.'' तमिळ अस्मितेचा प्रश्नही असा आहे.

श्रीलंकेत दोन अगदी निराळे तमिळ समूह आहेत. पहिले इसवीसनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून उत्तर आणि पूर्व श्रीलंकेत स्थायिक झालेले तमिळ. ते **श्रीलंकन तमिळ**. तमिळ एलम्‌ची मुळे इतकी जुनी आहेत. दुसरे तमिळ म्हणजे ब्रिटिशांनी १९व्या शतकात चहाच्या मळ्यांवर काम करायला भारतातून नेलेले तमिळ. त्यांची तेथली आज चौथी पिढी असली तरी त्यांची ओळख **भारतीय तमिळ** अशी होते.

स्वायत्त तमिळ राष्ट्र किंवा प्रांत आणि श्रीलंकेचे केंद्र सरकार यांच्यात संघर्ष झाला तो श्रीलंकन तमिळ आणि केंद्र सरकार यात. दहाव्या शतकात दक्षिण भारतातील चोल साम्राज्याने उत्तर लंका काबीज केली. मग तेराव्या शतकात या तमिळांचे आर्यचक्रवर्ती नावाचे साम्राज्य होते. ते नंतर आजच्या तमिळनाडूतील पांड्य साम्राज्याखाली आले. १५व्या शतकात पोर्तुगीज, १९व्या शतकात ब्रिटिश - या दोघांनीही भारत-श्रीलंका हा एकाच वसाहतीचा भाग म्हणून पाहिला. त्यामुळे श्रीलंकन तमिळांचे भारतीय तमिळांशी संबंध कायम राहिले, शिवाय संस्कृती हा महत्त्वाचा धागा. उर्वरित श्रीलंका सिंहली व बौद्ध आहे, तर तमिळ हिंदू. तमिळांच्या दृष्टीने उत्तर व पूर्व श्रीलंका कधीच सिंहली आधिपत्याखाली नव्हती.

श्रीलंकेतील बहुसंख्य सिंहलींच्या मते मात्र तमिळ साम्राज्यवाद इसवीसनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून चालू झाला. मग ब्रिटिश वसाहतवादाच्या - दुही माजवा व राज्य करा - धोरणानुसार तमिळ या अल्पसंख्याकांना ब्रिटिशांनी शिक्षण, नोकऱ्या यात झुकते माप दिले. त्यामुळे त्यांच्या तुलनेत सिंहली मागे पडले.

हा सल स्वातंत्र्यानंतर बाहेर आला आणि तमिळांना त्यांची जागा दाखवण्याची भाषा व धोरणे सुरू झाली. त्या अनुषंगाने भारताविषयी द्वेषही वाढू लागला. भारतीय तमिळ आणि श्रीलंकन तमिळ मिळून त्यावेळच्या एकूण देशाच्या लोकसंख्येच्या २०% होते. पण श्रीलंकन तमिळांनी निवडणुकांत ५०% आरक्षणाची मागणी लावून धरली. अशा अवाजवी मागण्यांनी दरी वाढली.

मग भारतीय तमिळ श्रीलंकेचे नागरिकच नाहीत असा कायदा करण्यात आला. (१९४८-४९.) त्यामुळे लाखो तमिळ कोणत्याच देशाचे नागरिक राहिले नाहीत. एकतर हे मजूर गुलामच. किमान गरजा भागतील एवढीच तरतूद मळ्याचे मालक करतात. त्यांना हक्क नाहीत, संघटना नाही. ते बहुधा अशिक्षित व खालच्या जातीचे असल्याने श्रीलंकन तमिळ त्यांना तुच्छ मानतात. म्हणजे श्रीलंकेतील हा सगळ्यात दुबळा गट. सरकारने त्यालाच लक्ष्य केले. श्रीलंकेचे नागरिकत्व हवे असल्यास अर्ज करणे भाग होते. 'शक्यतो हे लोक नकोतच' हे धोरण असल्याने ती प्रक्रिया क्लिष्ट व वेळकाढू होती. त्यात लाखो मजूर याबाबतच अनभिज्ञ होते. एका अंदाजानुसार अशा सुमारे साडेआठ लाख अर्जदारांपैकी फक्त दीड लाखांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळाले. मग १९६४ साली तेव्हाच्या पंतप्रधान सिरिमाओ भंडारनायके व भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्यात करार झाला. त्यानुसार पाच-सव्वा पाच लाख तमिळ भारतात पाठवण्यात आले. उरलेले तीन-साडेतीन लाख श्रीलंकेचे नागरिक झाले.

दरम्यान, १९५६ साली सिंहली ही एकच अधिकृत भाषा म्हणून जाहीर झाली. त्याने तमिळ अधिकच दुखावले. तेव्हापासून सिंहली-तमिळ दंगे सुरू झाले व माणसे बळी पडू लागली. नंतर १९७२ ला विद्यापीठातील प्रवेशातून तमिळांना वगळण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू झाले. जाफना या लंकन तमिळ प्रदेशातील प्रमुख शहरातील, विख्यात तमिळ लायब्ररी १९८१ला जाळण्यात आली. तेव्हापासून तमिळ एलमकडे हिंसेच्या मार्गाने वळणाऱ्यांची,

विशेषत: निराश व संतप्त तरुणांची संख्या वाढू लागली. कारण तमिळांचे लोकसंख्येतील प्रमाण - नागरिकत्व काढून घेणे, भारतात परत पाठवणे अशा उपक्रमांनी - इतके कमी झाले होते की सिंहली बहुमत कोणताही कायदा तमिळ लोकांच्या विरोधाला न जुमानता करू शकेल अशी व्यवस्था झाली. म्हणजे सनदशीर मार्गाने सत्तेत सहभागी होण्याची शक्यता संपुष्टात आली. Liberation Tigers of Tamil Elam (LTTE) या संघटनेला त्यामुळे बळ लाभले. तमिळनाडूच्या द्रमुक सरकारची LTTE ला पैसा पुरवणे, त्यांच्या नेत्यांना छुपा किंवा उघड आश्रय देणे अशी मदत चालू होतीच. १९८३ साली जाफनाजवळ एका लष्करी ताफ्यावर LTTE ने हल्ला केला आणि १५ जवानांना ठार मारले. त्याची प्रतिक्रिया म्हणून सिंहलींनी हजार ते तीन हजार तमिळांना ठार केले. तमिळांची घरे, दुकाने जाळून, माणसांना रस्त्यावर पेट्रोल ओतून पेटवून, बसेसमधून निवडून बाहेर काढून अशा अनेक प्रकारे. मतदार याद्यांतून तमिळांची राहण्याची-व्यवसायाची ठिकाणे निवडण्यात आली. हे श्रीलंकेचे गोध्रा. सरकारने त्या हिंसाचाराचे प्रमाण कधीच मान्य केले नाही. या हत्याकांडाचे दोन-तीन परिणाम झाले.

एकतर या देशात आपल्या जीवाचीच हमी नाही तर भवितव्याची काय असणार या भीतीने जवळजवळ आठ लाख तमिळ देश सोडून गेले. सुशिक्षित, मध्यमवर्गीयांनी विकसित देशात नोकऱ्या मिळवल्या. हातावर पोट असणाऱ्यांनी आहे नाही ती चीजवस्तू विकून पासपोर्ट विकत घेऊन, निर्वासित म्हणून नोंदणी करून घेतली आणि ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलियात पळ काढला. या लोकांचा पुढे LTTE ला उपयोग होणार होता.

दुसरा परिणाम म्हणजे जवळजवळ दीड लाख तमिळ निर्वासित म्हणून तमिळनाडूत आले. त्यामुळे तेथे श्रीलंकाविरोधी वातावरण अधिकच तापले. तमिळनाडू सरकारने केंद्र सरकारला तमिळींसाठी सक्रिय होण्याचे दडपण आणले. साधारण समजूत अशी आहे की या निर्वासितांच्या लोंढ्यामुळे भारत सरकार सक्रिय झाले. पण प्रत्यक्षात त्या आधीच्या दशकापासून LTTE ला सशस्त्र मदत, प्रशिक्षणासाठी छावण्या चालू झालेल्या दिसतात. १९८३ नंतर केंद्रीय Research and Analysis Wing ने जवळजवळ २२ छावण्यात LTTE चे प्रशिक्षण सुरू केले. १९८४ सालचे त्यांचे फोटोही उपलब्ध आहेत. त्यात प्रभाकरन हा LTTE चा नेताही दिसतो. (श्रीलंकेत भारताची विश्वासार्हता तेव्हापासून इतकी खालावली आहे की १९८३चा लष्करावरील हल्ला **आणि** नंतरचे तमिळांचे शिरकाण - **दोन्ही** भारताने केले असा दावा तेथील पत्रकार आजही करतात आणि तो खरा मानला जातो.)

म्हणजे, इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत या साम्राज्यवादाची सुरूवात झाली आणि तेच धोरण राजीव गांधींनी चालू ठेवले.

त्याचा भाग म्हणून १९८७ला Indian Peace Keeping Force (IPKF) - शांतिसेना - ची नियुक्ती श्रीलंकेत करण्यात आली. त्याचा मूळ उद्देश LTTE व सरकार यांनी वाटाघाटींनी प्रश्न सोडवावा यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे हा होता. IPKF ने LTTE चे नि:शस्त्रीकरण करावे हा कराराचा भाग होता. एका दृष्टीने पाहता श्रीलंकेने LTTE चा काटा IPKF च्या मार्फत काढण्याचा प्रयत्न केला असेही म्हणता येईल. पण LTTE ने शस्त्रे खाली तर ठेवली नाहीतच, IPKF शीच चकमकी सुरू केल्या. शेवटी १९८९ला विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान झाल्यावर IPKF ला श्रीलंकेतून परत आणण्यास सुरूवात झाली. दरम्यान १२०० भारतीय जवान आणि ८ ते १० हजार LTTE चे सैनिक मृत्युमुखी पडले होते. या कारवाईचे शिल्पकार - राजीव गांधी यांची १९९१ साली LTTE ने आत्मघातकी हल्ल्यात हत्या केली. विशेष म्हणजे, IPKF ला श्रीलंका सोडायला भाग पडावे म्हणून तेव्हाचे अध्यक्ष प्रेमदास यांनी LTTE ला IPKF विरुद्ध लढण्यासाठी शस्त्रास्त्रे पुरवल्याचा संशय आहे! यावरून हा प्रश्न श्रीलंकन सरकार विरुद्ध तमिळ इतका एकरेषीय नव्हता असे दिसते. प्रेमदास यांनाही १९९३ साली LTTE ने अशाच हल्ल्यात ठार मारले.

राजीव गांधींच्या हत्येनंतर भारताने LTTE ही दहशतवादी संघटना असल्याचे १९९३ साली जाहीर केले. दरम्यान पश्चिमेत स्थायिक झालेल्या तमिळ वंशाच्या लोकांकडून पैसे उकळण्याचा LTTE चा उद्योग सुरू होता. धमक्या देऊन खंडणी घेणे, अंमली पदार्थांचा चोरटा व्यापार करणे, क्रेडिट कार्डस्‌ची गुन्हेगारी अशा अनेक प्रकारे LTTE आंतरराष्ट्रीय स्तरावर पैसे मिळवत असे. त्यावर बंदी यावी म्हणून १९९७ साली अमेरिकेने, २००० साली ब्रिटनने व नंतर सुमारे ३० देशांनी LTTE ला दहशतवादी ठरवले.

IPKF च्या निर्गमनानंतर श्रीलंका सरकार व LTTE युद्ध २००९ पर्यंत चालले. मग महिंद राजपक्ष यांच्या अध्यक्षतेखाली २००९ला LTTE चा संपूर्ण पाडाव करण्यात आला. त्यात ४०,००० ते १,२०,०० निरपराध तमिळ नागरिक श्रीलंकन सैन्याने ठार मारले असावेत. पांढरी निशाणे दाखवत, शस्त्रे खाली ठेवून शरण आलेल्या LTTE च्या लष्करी व्यक्तींनाही ताब्यात घेऊन ठार मारण्यात आले, स्त्री-सैनिकांवर अत्याचार करून त्यांना ठार मारण्यात आले. प्रभाकरनच्या १२ वर्षांच्या मुलाला तो काहीतरी खात असताना पाच गोळ्या घालून ठार केले गेले. या नृशंस नरसंहाराला बहुसंख्य सिंहलींची मान्यता असल्याने सरकारला प्रचंड पाठिंबा मिळाला व राजपक्ष पुन्हा अध्यक्षीय निवडणूक जिंकले (२०१०).

युद्धाच्या शेवटच्या दिवसातील मानवी हक्कांच्या *(पान ३० वर)*

***जगभर,*** *(पान १३ वरून)*

पायमल्लीवरील सततच्या आंतरराष्ट्रीय टीकेला उत्तर म्हणून एक शोध समिती नेमण्यात आली. तिने अपेक्षेनुसार लष्कराला निर्दोष ठरवले.

श्रीलंकेतील तमिळांची सद्यस्थिती अशी आहे. एकीकडे मध्य श्रीलंकेतील चहाच्या मळ्यावरच्या मजुरांची तहहयात वेठबिगारी चालूच राहणार. त्यात ते तमिळ असल्याने अन्यायात संशयाचीही भर आहे. श्रीलंकन तमिळांच्या उत्तर आणि पूर्व श्रीलंकेमधील पूर्व भागात निदान प्रादेशिक निवडणुका झाल्या आणि तमिळांच्या पक्षाला बऱ्याच जागा मिळाल्या. परंतु LTTE च्या अखत्यारीतील दग्धभू उत्तरेत परिस्थिती गंभीर आहे. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात तेथे निवडणुका नियोजित आहेत. पण निवडणुका झाल्या तरी तमिळ प्रदेशांना थोडीफार तरी स्वायत्तता केव्हा व कशी मिळणार हे सांगणे कठीण आहे. एकूण देशाची मानसिकता पाहता तेथे LTTE चा बिमोड हा तमिळांचा पराभव व साम्राज्यवादी भारताचे नाक कापले गेले अशा दृष्टीने पाहिला जात आहे. ते राष्ट्र या उन्मादात आहे.

एक महत्त्वाचा मुद्दा या संदर्भात तुलनेसाठी पाहण्यासारखा वाटतो. १९३०-१९४० सालापासून तमिळ (द्रविड) राष्ट्र भारतातून वेगळे काढावे अशी मागणी पुढे आली. रामस्वामी नायकर यांनी त्यासाठी स्वातंत्र्याआधी जीनांशी हातमिळवणी करण्याचाही प्रयत्न केला. या बृहत् तमिळ राष्ट्रात श्रीलंकेचे उत्तर व पूर्व भागही आणण्याचे स्वप्न होते. LTTE नेही मध्यंतरी हीच कल्पना मांडली होती. मुळात पेरियार नायकरांच्या जस्टिस पार्टीचा जन्म काँग्रेसमधील ब्राह्मण्यवाद व स्वतंत्र भारतात तमिळ प्रदेशांवर हिंदी भाषा सक्तीने लादली जाईल अशी भीती - या दोन कारणांनी झाला. कालौघात ही दोन्ही कारणे मिटल्यावर एकेकाळी भारताचा झेंडा जाळणारे कळघमचे नेते आता तसे करत नाहीत. लोकशाहीतून विरोधकांना राजकीय अवकाश देण्याची ही समावेशकता श्रीलंकेत दिसत नाही. त्यामुळे प्रश्न चिघळत गेला.

आता लेखाच्या सुरूवातीला उल्लेख केलेले मुद्दे पाहू. अस्मितेच्या संदर्भात वांशिक, धार्मिक आणि राष्ट्रवादाचे मुद्दे लेखात आले आहेत. आर्थिकदृष्ट्या चहाच्या मळ्यावरच्या मजुरांची स्थिती सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारात चहा खरेदी करणाऱ्या मोठ्या कंपन्यांनी सरकारवर दडपण आणले तर थोडी सुधारणा होणे शक्य आहे. जागतिकीकरणाच्या रेट्याने हे आज शक्यही आहे. (बांगलादेशातील, भारतातील बालमजुरी हा प्रश्न तरी अशा दडपणाने पुढे आला.)

श्रीलंकेतील नैसर्गिक संपत्तीसाठी भारत व चीन यात चढाओढ अटळ आहे. त्यांच्यात चुरस लावणे श्रीलंकेच्या आर्थिक फायद्याचे आहे पण तो फायदा तमिळांपर्यंत पोचणे कठीण वाटते. महिंद राजपक्ष या अध्यक्षाची घराणेशाही लोकशाही मार्गाने चालू आहे. त्यांचा एक भाऊ संरक्षणमंत्री, एक लोकसभापती तर एक अध्यक्षीय सल्लागार आहे. राजपक्ष कुटुंबीय देशाचा ७०% अर्थसंकल्प नियंत्रित करतात. अशा 'लोकशाही'त हेतुपुरस्सर उपेक्षित ठेवलेल्या वर्गाला न्याय मिळणे कठीण दिसते.

या प्रश्नाने राष्ट्र-राज्याच्या मर्यादाही स्पष्ट व्हाव्यात. राष्ट्र ही एक शुष्क, वैध वस्तुस्थिती दिसते. तिच्या व्याख्येनुसारच ती भौगोलिक सीमांकित असते. मग शेजारच्या भूभागात (राष्ट्रात) हस्तक्षेप करता येत नाही. त्यात, त्या भूभागात समवंशीयांची कत्तल होत असेल तरी निमूटपणे पहावे लागते. मग हा प्रश्न भावनिकदृष्ट्या आणखीच बिकट होतो. उदाहरणार्थ, श्रीलंकेतील भारताची संपुष्टात आलेली विश्वासार्हता पाहता कोणतीही सहसंवेदनेची अभिव्यक्ती साम्राज्यवाद मानली जाईल.

जगातील अनेक दुर्लक्षित, उपेक्षित व विसर पडलेल्या समुदायात श्रीलंकेतील तमिळ हा आणखी एक समुदाय दाखल झालेला दिसतो.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*